# माहिती तंत्रज्ञान आणि ग्रामविकास

**प्रा.डोंगरे एल.बी** हिमायतनगर

**प्रस्तावना :-** २१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे शतक म्हणुन ओळखले जाते. माहिती तंत्रज्ञानाचा शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागावरही व्यापक असा प्रभाव पडलेला आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्रामीण भारतातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थीक जीवन पुर्णपणे बदलेले आहे. माहिती तंत्र ज्ञानाच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा रचनात्मक विकास होण्यास मदत झाली आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्रामीण भारतात आर्थीक वृध्दी, सामाजिक सबलीकरण, शैक्षणिक विकास, सामाजिक सेवा, दळणवळण, आरोग्याच्या सोयी, सुशासन, ई-शासन इत्यादी घटकांवर माहिती तंत्रज्ञानाने लक्ष केंद्रित केल्यामुळे ग्रामीण भागाची दशा संपवून विकासाला योग्य दिशा मिळाली आहे. ग्रामीण भागाबाबत महात्मा गांधी म्हणतात घदिल्ली भारत नाही तर भारत गावांमध्ये आहे.ङ अर्थात भारताला विकासाच्या उंच शिखरावर न्यायचे असेल तर भारतातील ग्रामीण भागाच्या दशेला पुर्णविराम देवून विकासाची दिशा दयावी लागेल म्हणून महात्मा गांधी यांनी भविष्याचा वेध घेवून घखेडयाकडे चलाङ असे म्हणाले होते. जेंव्हा जेंव्हा भारताच्या विकासाचा प्रश्न समोर आला तेंव्हा ग्रामविकासाला प्राधान्य देण्यात आले. भारतातील ७०% लोक हे ग्रामीण भागात राहतात त्यामुळे त्यांच्या विकासाशिवाय भारताचा विकास साधला जावू शकत नाही. म्हणून भारत सरकारने ग्रामविकासाला प्राधान्य देवून स्वतंत्र ग्रामविकास मंत्रालयाची स्थापना केली आहे.

**ग्रामविकासाची संकल्पना :-**

ब्रिटिशपूर्व काळात खेडे ही स्वयंपूर्ण होती परंतू ब्रिटिश राजवटीत ग्राम भागाचा विकास होण्याऐवजी ती बकाल झाली. ब्रिटिश राजवटीक औद्योगीकीकरणाला, शहरीकरणाला चालना मिळाल्यामुळे शहरी भागाचा विकास होवून ग्रामीण भाग हा विकासापासून कोसो दूर राहीला. ग्रामीण हस्तकला व उद्योगांचा ऱ्हास झाल्यामुळे ग्रामीण कारागीर हा शहराकडे धावू लागला. यातून खेडे ओस पडून शहरीकरणाला चालना मिळाली. तात्पर्य ब्रिटिश राजवटीत आधुनिकतेची वारे वाहिली, सामाजिक सुधारणा झाल्या असल्या तरी अपेक्षित मुलगामी ग्रामीण विकास झाला नाही. स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण भागाच्या विकासाला प्राधान्य देण्यात येवू लागले. भारत सरकारने रचनात्मक विकास करण्यासाठी दारिद्रय निर्मुलन, आर्थिक स्वावलंबन, शेतीचा विकास, सहकारी संस्था, ग्रामोद्योगाला चालना, शिक्षणाचा प्रचार व प्रसार, दळणवळण, आरोग्याच्या सोयी इत्यादी घटकांवर लक्ष केंद्रित करुन ग्रामीण भागाचा विकास करण्याचा प्रयत्न केला. १९८० च्या दशकात माहिती तंत्रज्ञानाचे वारे वाहू लागले. माहिती तंत्र ज्ञानाच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी माहिती तंत्रज्ञानाच्या प्रचार व प्रसाराला प्राधान्य दिले. भाजप च्या एनडीए सरकारने इंडिया शायनिंग नावाचा अभिनव उपक्रम राबवून माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्रामविकास करण्यावर भर देण्यात आला. युपीए - २ च्या भारत सरकारने भारत निर्माण नावाच्या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील रस्ते, पाणी, विज, शिक्षण, आरोग्य, दळणवळण, शासकीय योजना इत्यादी क्षेत्रात विशाल दिर्घकालीन व्यावहारीक योजना निर्माण करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

**ग्रामविकासाची व्याख्या :-** १) कार्ल टेलरच्या मते घ्राम विकास ही अशी पध्दत आहे की, ज्यामध्ये ग्रामीण लोक आपली आर्थीक व सामाजिक परिस्थिती सुधारावी म्हणून मदत करण्यासाठी सहभागी होतात आणि त्याजोगे ते आपल्या राष्ट्रीय विकासाच्या कार्यक्रमात कार्य करणारे प्रभावी समुह बनतात.ङ २) ओ.पी.दायमाच्या मते घ्राम विकास म्हणजे समान भुप्रदेशावर वास्तव्य करणाऱ्या आणि परस्परांशी अवलंबन संबंध असणाऱ्या लोकसमुहातील संभाव्य क्षमतांचा व गुणांचा विकास करण्यासंबंधीचा कार्यक्रम होय.ङ

**माहिती तंत्रज्ञान आणि ग्रामविकास :-** ग्रामीण भागाच्या विकासाशिवाय भारताचा विकास अशक्य बाब आहे. म्हणून भारताचा कणा असणाऱ्या ग्रामीण भागाचा रचनात्मक दिशेने विकास करण्यासाठी भारत सरकारने माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा आणि ग्रामीण भागातील नागरिकांच्या जीवनात आमुलाग्र आणि क्रांतिकारक परिवर्तन केले आहे. म्हणून माहिती तंत्रज्ञानाचा ग्रामविकासावरील प्रभाव आपणांस पुढील प्रमाणे सांगता येतो.

**टेलीकम्युनिकेशन आणि ग्रामविकास :-** ग्रामीण भागात दळणवळणाच्या साधनांचा अभाव होता. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रचार आणि प्रसारानंतर टेलीकम्युनिकेशनची सुविधा गतिमान झाली. टेलीकम्युनिकेशनची सुविधा प्रदान करण्यासाठी शासकीय आणि अशासकीय यंत्रणा कार्यरत आहेत. भारतातील तांडया, वाडया, वस्तीत आणि अतिदुर्गम भागातील झोपडयातही

मोबाईलचे रिंग वाजतांना दिसून येत आहे. यामुळे दळणवळणाच्या क्षेत्रात आमुलाग्र बदल झाला आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना संक्षिप्त संदेश सेवेच्या (एस.एम.एस.) माध्यमातून हवामान विषयक माहिती, बाजारभाव विषयक माहिती, शिक्षण, रोजगार, स्पर्धा परीक्षा विषयक माहिती संक्षित संदेश सेवेच्या माध्यमातून सहज, स्वस्त,

सुलभ पध्दतीने प्राप्त होत आहे. याशिवाय मोबाईल बँकिंगची व्यवस्था ग्रामीण भागातील नागरिकांसाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. शासनाच्या आरोग्य विभागाकडून टेलीमेडीसीन, मोबाईल ॲम्ब्युलन्सची व्यवस्था करण्यात आली आहे. ३० ऑगस्ट २०११ पर्यंत भारतात २८२.२९ मिलीयन लोकांकडे भ्रमणध्वनी (मोबाईल) आहेत तर ४.८४ मिलीयन लोकांकडे दुरध्वनी आहेत.

**अंतरजाल आणि ग्रामविकास :-** अंतरजाल म्हणजे ज्ञानाचे अद्भूत भांडार आहे. भारत सरकारने माहिती तंत्रज्ञानाला गतीमान करण्याची जबाबदारी सॅमपित्रोदा सारखी अनुभवी आणि निष्णांत व्यक्तीकडे सोपविण्यात आली. सॅमपित्रोदा आणि त्यांच्या सहकार्यानी १९८० साली भारतात अंतरजाल सेवा सुरू करण्यात आली आहे. भारत सरकारने १५ ऑगस्ट १९९५ पासून अंतरजाल सुविधा सर्वांसाठी खुली करण्यात आली आहे. भारत सरकारने भारत निर्माण कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण भागात Internet connectivity and Broad band सारख्या सुविधा उपलब्ध करुन दिल्यामुळे याचा सर्वात जास्त फायदा ग्रामीण भागातील तरुणांना होत आहे. अंतरजाल सेवेच्या माध्यमातून शिक्षणाविषयी, अभ्यासक्रम, प्रवेश, स्पर्धा परीक्षा , नौकरीच्या प्रवेश अर्ज , प्रवेश पत्र, निकाल पाहण्याची सुविधा ग्रामीण भागात सहज सुलभरित्या प्राप्त होत आहे. अंतरजाल सुविधेमुळे ग्रामीण भागात रोजगारांची निर्मीती झाली आहे. शासनाच्या महा ई-सुविधेमुळे शासनास्तरावरील अत्यावश्यक कागदपत्रे ग्रामीण नागरिकांना विनाअट तात्काळ प्राप्त होत आहेत. अंतरजाल सेवेमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना इंटरनेट बँकींग, रेल्वे, विमान आरक्षण सुविधा, डिश टि.व्ही.रिचार्ज, ई-मेल, व्हिडीओ कॉन्फरसिंग यासारख्या सुविध ग्रामीण भागात निर्माण झाल्यामुळे ग्रामीण भागाचा रचनात्मक विकास होवून ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलतांना दिसून येत आहे.

**राष्ट्रीय दुरसंचार निती आणि ग्रामविकास :-** युपीए - २ सरकारने भारत निर्माण कार्यक्रमाला अधिक प्रभावशाली व गतीमान करण्यासाठी **नॅशनल टेलीकॉम पॉलीसी २०१२** ला मंजूरी देवून ग्रामीण भागाच्या दुरगामी विकासाला चालना दिली. राष्ट्रीय दुरसंचारनिती २०१२ नुसार ग्रामीण भागात २०१७ पर्यंत ७०% आणि २०२० मध्ये १००% दुरसंचार सुविधा निर्माण करण्याचा भारत सरकारचा मानस आहे. २०१४ पर्यंत भारतातील सर्व ग्रामपंचायतींना ब्रॉडबॅन्ड सुविधेने जोडले जाणार आहे. २०१४ मध्ये देशातील सर्व ग्रामपंचायती ब्रॉडबॅन्डने जोडल्यास याचा सरळ फायदा ग्रामीण नागरिकांना मिळणार आहे. अंतरजाल सुविधा ग्रामीण भागात पोहचल्यामुळे सर्व शासकीय योजनांचा लाभ नागरिकांना घेता येणार आहे. राशनकार्ड, निवडणूक ओळखपत्र, विजबील, पाणीबील, पासपोर्ट, शेती, संपत्ती विषयीचे महत्वपूर्ण कागदपत्रे, शाळा, महाविद्यालय, विद्यापीठांचे प्रमाणपत्र सहज सुलभ स्वस्त दरात ग्रामीण भागातील नागरिकांना मिळणार आहेत. यामुळे ग्रामीण भागातील लोकांचा विकास होवून रोजगारांच्या संधी निर्माण होतील.

**नॅशनल ई-गव्हर्नमेंट पॉलीसी आणि ग्रामविकास :-** राष्ट्रीय ई-गव्हर्नमेंट पॉलीसी नुसार माहिती तंत्रज्ञानाचा ढाचा प्रस्तापीत करण्यासाठी राज्यनिहाय एरिया नेटवर्क आणि स्टेट डेटा सेंटरची सुरूवात करण्यात आली आहे. माहिती तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्यामागचा मुख्य उद्देश असा आहे, प्रशासनातील भ्रष्टाचार थांबवून प्रशासन गतीमान आणि लोकाभिमुख करणे. माहिती तंत्रज्ञानाची व्याप्ती वाढल्यामूळे प्रशासनातील भ्रष्टाचार कमी होण्यास मदत झाली आहे. शासनाच्या ई-गव्हर्नमेंटच्या माध्यमातून शैक्षणिक सुविधा, सामाजिक, आरोग्य विषयक सुविधा सहज सुलभ मिळत असल्यामुळे ग्रामीण भागातील लोकांचा राहणीमानाचा दर्जा उंचावून ग्रामविकासाला योग्य दिशा प्राप्त होतांना दिसून येत आहे.

**निष्कर्ष :-** भारत हा खेडयांचा देश असल्यामुळे ग्रामीण भागाचा विकास झाल्याशिवाय भारताचा विकास होवू शकत नाही. म्हणून शासनाच्या माध्यमातून ग्रामविकासाला प्राधान्य देण्यात आले आहे. माहिती तंत्रज्ञानाची जोड शासनाने ग्रामविकासासाठी दिली आहे. यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना सोयीसुविधा निर्माण होवून त्यांच्या राहणीमानात आमुलाग्र परिवर्तन झाले आहे. माहिती तंत्र

ज्ञानामुळे ग्रामीण भागात महिलÖा सबलीकरण, महिलांमध्ये जाणीवजागृती, महिलांचे आर्थीक स्वावलंबन, दुरस्थ शिक्षण, परंपरागत शिक्षणाऐवजी अत्याधुनिक शिक्षण, साक्षरतेच्या प्रमाणात वाढ, व्यक्तीच्या उत्पादकतेत वाढ, दळणवळणाच्या क्षेत्रात क्रांती, आरोग्याच्या सोयी, सामाजिक सेवा, शासकीय सेवा सहज सुलभ ग्रामीण भागात मिळतांना दिसत आहेत.